# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे

## शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) ऑगस्ट-२०१७

**(GOVERNMENT CERTIFICATE IN COMPUTER TYPING BASIC COURSE (GCC-TBC) EXAMINATION AUGUST-2017**

# अधिसूचना
# व
# ऑनलाईन
# आवेदनपत्र स्विकृती
# कार्यक्रम

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१.

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६१२३०६६/६७**

**E-mail – mscepune@gmail.com**

**Website : www.mscepune.in**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (जीसीसी-टीबीसी)**

**ऑगस्ट २०१७**

# *परीक्षेशी संबंधित अधिकारी*

| अ. क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. दिनकर पाटील | अध्यक्ष |
| २. | श्री. सुखदेव डेरे | आयुक्त |
| ३. | श्री. राजेश क्षीरसागर | सहायक आयुक्त तथा उपायुक्त |
| ४. | श्री. खाडे जी.बी. | मूल्यमापन अधिकारी (जी.सी.सी. मूल्यमापन) |
| ५. | श्री. पी. एच. गायकवाड | अधीक्षक (जी.सी.सी. प्रशासन) |
| ६. | सौ. वसुधा भागवत | लेखाधिकारी |
| **ऑनलाईन माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्याकरीता ०२०-२६१२३०६६/६७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.** | | |

## महत्वाचे

१) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

२) त्यामुळे अधिसूचनेचे व संकेतस्थळावरील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे.

३) कृतीओघ तक्त्याचे (Flowchart) अवलोकन करुनच आवेदनपत्रे भरावीत.

४) आवेदनपत्रे भरल्यानंतर ऑनलाईन एकत्रित शुल्क भरण्यासाठी स्वतंत्र कालावधी दिला आहे. ऑनलाईन बँकींग, क्रेडीट/डेबीट कार्डाद्वारे विहित मुदतीत शुल्क भरण्याची दक्षता घ्यावी.

(चलन प्रिंट काढून बँकेत जाऊन रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध नाही.)

५) परीक्षा केंद्र निवडीबाबत संस्थांनी विहित कालावधीत कार्यवाही करावी. यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाईल.

**<u>परीक्षा प्राधान्य :</u>**

क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./अधिसूचना/ऑगस्ट-२०१७/३९७८
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक : ०६/०७/२०१७

**प्रति,**
**संस्थाचालक / प्राचार्य,**
**सर्व शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र राज्य.**

**विषय :- <u>शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा : ऑगस्ट -२०१७ (GCC-TBC ३० व ४० श.प्र.मि.) अधिसूचना व ऑनलाईन आवेदनपत्र स्विकृती कार्यक्रम.</u>**

**संदर्भ :- परिषदेचे पत्र जा. क्र. मरापप/प्रशा/संटा/२०१७/२२०६ , दिनांक १३/०४/२०१७**

राज्यातील शासनमान्यता प्राप्त संगणक टायपिंग संस्थामधील नियमित विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत ऑगस्ट - २०१७ मध्ये शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC ३० व ४० श.प्र.मि. गतीसाठी) इंग्रजी, मराठी व हिंदी माध्यमासाठी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या संगणक टायपिंग संस्थेमार्फत ३० व ४० श.प्र.मि. गतीसाठी स्वतंत्र आवेनदपत्रे ऑनलाईन मागविण्यात येत आहेत.

जानेवारी २०१७ ते जून २०१७ या सत्रासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांची ऑनलाईन नोंदणी परिषदेच्या संकेतस्थळावर केली आहे. त्याच विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे ऑगस्ट २०१७ मध्ये होणाऱ्या ३० व ४० श.प्र.मि. परीक्षेसाठी भरता येतील.

मागील परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या, विद्यार्थ्यांना पुर्नपरीक्षार्थी (रिपीटर) म्हणून ऑगस्ट २०१७ मध्ये होणाऱ्या परीक्षेस प्रविष्ठ होता येईल.

**अ) <u>परीक्षेस पात्र होण्यासाठीचे निकष :</u>**

१. उमेदवार शासनमान्य शाळेतून किमान ८ वी उत्तीर्ण असावा.
२. शासनमान्य संगणक टायपिंग संस्थेत आठवडयात किमान ४ तासांप्रमाणे परिक्षेच्या तारखेपूर्वी ४ महिने किंवा ८० घड्याळी तास नियमित विद्यार्थी म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे. (घड्याळी तास ६० मिनिटांचा असतो.)
३. विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन पध्दतीने परिषदेच्या संकेतस्थळावर संबंधित संस्थेमार्फत केलेली असावी.

**आ) परीक्षेचे वेळापत्रक : इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि. या विषयाची परीक्षा साधारणपणे दि. १६ ते २४ ऑगस्ट २०१७ या कालावधीत होईल. तर मराठी/हिंदी ३० व ४० श.प्र.मि. या विषयांची परीक्षा दि. २७ ऑगस्ट ते १ सप्टें. २०१७ या कालावधीत होईल. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक स्वतंत्रपणे परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

**इ) <u>शुल्कः-</u>**

१. **परीक्षा शुल्क** :- रु. ५००/- प्रतिविषय/प्रतिविद्यार्थी
२. **विलंब शुल्क** :- रु. २००/- प्रतिविषय/प्रतिविद्यार्थी
३. **नोंदणी शुल्क** :- संगणक टायपिंग संस्थांसाठी रु. १०००/- प्रतिवर्षी.
(नोंदणी शुल्क जानेवारी ते डिसेंबर या कालावधीसाठी आकारण्यात येईल. वर्ष २०१७ चे नोंदणी शुल्क परीक्षा शुल्काच्या ऑनलाईन चलनात समाविष्ट केले जाईल.)

**ई) शुल्क भरण्याची पध्दत:-**

१. संस्थेने सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या **लिंकवर संस्था लॉगीनद्वारे ऑनलाईन पध्दतीने भरावे. (चलनाद्वारे किंवा ऑफलाईन पध्दतीने शुल्क भरु नये.)**

२. ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरुन चलन अपडेट झाल्याशिवाय आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही याची नोंद घेण्यात यावी. **(इतर कोणत्याही पध्दतीने परीक्षा शुल्क भरण्यात येऊ नये, ते ग्राह्य धरण्यात येणार नाही व शुल्क परत करण्यात येणार नाही.)**

३. नियमित शुल्क विहित कालावधीत न भरल्यास विलंब शुल्क लागू होईल. (नियमित शुल्क कोणत्याही कारणामुळे भरले न गेल्यास विलंब शुल्क लागू होईल.)

**उ) परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकृतीचा कार्यक्रम :-**

१. नियमित ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कालावधी व नियमित आवेदनपत्राची/परीक्षा विद्यार्थी यादी प्रिंट आऊट काढणे **:- दि. ०७/०७/२०१७ ते १२/०७/२०१७**

२. नियमित आवेदनपत्राचे परीक्षा शुल्क ऑनलाईन भरण्याचा कालावधी **:- दि. १३/०७/२०१७ ते १५/०७/२०१७**

३. विलंब शुल्काचे ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कालावधी **:- दि. १३/०७/२०१७ ते १५/०७/२०१७**

४. विलंब आवेदनपत्राचे परीक्षा शुल्क ऑनलाईन भरण्याचा कालावधी **:- दि. १७/०७/२०१७ ते १८/०७/२०१७**

**टिप :-** ऑनलाईन आवेदनपत्राची एक प्रिंट काढुन विद्यार्थ्यांची स्वाक्षरी व संस्थेच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह संबंधित संस्थेने आपल्या दप्तरी जतन करून ठेवावी.

१. **अतिविलंबाची सवलत रद्द करण्यात आली आहे.**

**ऊ) बँकेचे चलन वाटप :-**

परीक्षा शुल्क केवळ ऑनलाईन पध्दतीने संस्था लॉगिनद्वारे भरावयाचे असल्याने ऑफलाईन चलन देण्यात येणार नाही.

**(चलनाने शुल्क भरल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाही.)**

**ए) आवेदनपत्राची उपलब्धता:-**

आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावयाची आहेत. सदरचे आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर **दिनांक ०७/०७/२०१७ रोजी** उपलब्ध करण्यात आली आहेत.

# ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

www.mscepune.in वेबसाईटला भेट देणे.

↓

GCC Examination या Tab वर क्लिक करा.

↓

ID व Password द्वारे Login करा.

↓

C.T.Apply Regular August ३०/४०wpm लिंकवर Click करा.
रिपिटर विद्यार्थ्यांसाठी C.T.Apply Repeater August३०/४०wpm लिंकवर Click करा.

↓

Candidate List समोरील Apply बटनावर क्लिक करून त्यामधील मुद्देनिहाय अचूक माहिती भरा.

↓

सर्व माहिती अचूक भरल्याची पुन्हा खात्री करूनच Update बटनावर क्लिक करा.

↓

Apply केलेल्या सर्व विद्यार्थ्यांच्या यादीचे अवलोकन करणे.

↓

भरलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करून दप्तरी जपून ठेवावी.

↓

विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने संस्था लॉगीनव्दारे परीक्षा शुल्क भरावे.

↓

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून झाल्यानंतरच  Exam Candidate list ची प्रिंट घ्यावी

## ऐ) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत सूचना :-

### A. सर्वसाधारण सूचना :-

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता प्रथमतः परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

२. सदर संकेत स्थळावरील G.C.C. Examination वर Click करावे. त्यानंतर स्क्रीनवर Login चा बॉक्स दिसेल त्यामध्ये दिलेली माहिती भरावी व Login करावे.

३. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना चुका होऊ नयेत म्हणून संस्थाचालकांनी/प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत आवेदनपत्र अचूक भरावे.

४. **स्क्रिनवर नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची यादी दिसेल. विद्यार्थ्यांच्या नावासमोरील Apply बटनावर क्लिक करावे.**

५. Apply बटनावर Click केल्यानंतर Gender, General Register no. व Handicaped या बाबी नमुद करावेत. त्यानंतर Update बटनावर Click करावे. Update या बटनावर Click केल्यानंतर आवेदनपत्रामध्ये कोणताही बदल केला जाणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी. अंध विद्यार्थ्यांबाबत सनेत्रवाचक (मदतनीस) हवा असल्यास सनेत्र वाचकाची माहिती अचूक भरावी. Online payment व्दारे परीक्षा शुल्क भरावे.

६. **Update केलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी. त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन नाव व संस्था कोड लिहावा व आपल्या दप्तरी जपून ठेवावी.**

## ओ) संस्थाप्रमुख व विद्यार्थी यांच्यासाठी महत्त्वाच्या बाबी :-

१. **सदर परीक्षा ही फक्त जी.सी.सी.-टी.बी.सी. ३०/४० श.प्र.मि. (मराठी/हिंदी/इंग्रजी) या विषयाकरीता घेण्यात येणार आहे.**

२. ऑनलाईन आवेदनपत्रे भरुन झाल्यानंतर संस्था लॉगिनमध्ये प्रिलिस्ट दिली जाईल. विद्यार्थ्यांच्या नावाचे स्पेलिंग, विषय, फोटो इत्यादी दुरुस्त्या संस्थांना ऑनलाईन पध्दतीने करता येतील. ऑफलाईन दुरुस्त्या केल्या जाणार नाहीत.

३. प्रिलिस्टच्यावेळी संस्थांनी उपलब्ध असलेल्या परीक्षा केंद्राच्या ड्रॉपडाऊन लिस्टमधून परीक्षा केंद्र निवडणे अनिवार्य राहील. मात्र निवडलेले परीक्षा केंद्र मिळेलच असे नाही. परीक्षा केंद्राची निवड न केल्यास प्रवेशपत्रे दिली जाणार नाहीत.

४. **परीक्षेची बॅच परीक्षा परिषदेकडून प्रवेशपत्रावर देण्यात येईल. परिषदेकडून देण्यात आलेली बॅच यात कोणताही बदल केला जाणार नाही. परीक्षार्थ्यांना शक्यतो टंकलेखन संस्थेच्या जवळचे परीक्षा केंद्र परिषदेकडून दिले जाईल. मात्र कमी विद्यार्थी संख्या, आवश्यक साधनसामग्रीची उपलब्धता न होणे या बाबींमुळे अन्य / दूरचे परीक्षा केंद्र दिले जाईल.**

- परीक्षा केंद्र निवडीबाबत संस्थांनी विहित कालावधीत कार्यवाही करावी. यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाईल.

५. परीक्षेपूर्वी ५ दिवस अगोदर पात्र उमेदवारांची **प्रवेशपत्रे (हॉल तिकीट)** संस्थांना परिषदेच्या संकेतस्थळावर संस्थांच्या लॉगिनमध्ये ऑनलाईन दिली जातील. त्यानुसार संस्थांनी आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांच्या प्रवेशपत्रांची प्रिंट काढून संस्थेच्या सही व शिक्क्यासह परीक्षेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर विद्यार्थ्यांना वितरीत करावीत.

६. ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये उमेदवाराचे नाव व नावाचे इंग्रजी स्पेलिंग, विषय, उमेदवाराची स्वाक्षरी याबाबतचा तपशील अचूक नोंदविण्यात यावा.

- **ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये संबंधीत संगणक टायपिंग संस्थेकडुन फोटो व सही बदल किंवा नावातील स्पेलिंग मध्ये चूक झालेली असल्यास कोणत्याही परिस्थितीत बदल करून दिला जाणार नाही, याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी. त्याकरिता संस्थांनी आवेदनपत्राची एक प्रिंट काढून ठेवावी.**

७. **परीक्षार्थीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही याची उमेदवारांनी व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे अतिरिक्त शुल्क भरण्यात येवू नये.**

८. परीक्षा शुल्काच्या ऑनलाईन पावतीवर दिनांक, संस्थेचे नांव व सांकेतांक असल्याची खात्री करावी.

९. प्रवेशपत्र जाहिर झाल्यानंतर पत्रव्यवहार करताना विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्राची छायांकित प्रत पाठविणे आवश्यक आहे अन्यथा अशा पत्रव्यवहाराचा विचार केला जाणार नाही. त्यासाठी प्रत्येक आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी.

१०. **अंध विद्यार्थ्यांबाबत :-** अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी शासनाने शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र: बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि. १०/१०/२००१ नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सनेत्र वाचकाने (मदतनीस) वाक्य, शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखित करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग दोन साठी (गती उतारा) ७ मिनिटां ऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यास शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि. ३१ डिसेंबर २००१ नुसार मान्यता दिलेली आहे. ही सवलत GCC-TBC परीक्षेसाठीही लागू राहिल.

११. **दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत :-** दिव्यांग विद्यार्थ्यांना टंकलेखन कौशल्य प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अवयवामध्ये म्हणजे हात किंवा बोटे यामध्ये ४० % टक्के किंवा त्याहुन अधिक कायम स्वरूपी दिव्यांगत्व आलेले असल्यास व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हिल सर्जन) तसे प्रमाणित केलेले असल्यास ३० श.प्र.मि. गतीची परीक्षा, या टंकलेखनाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी अपंग उमेदवारास ७ मिनिटां ऐवजी १० मिनिटे म्हणजेच ३ अधिक मिनिटांची सवलत देण्यास शासनाने, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.परीक्षा-२०१५/प.क्र.४७२/एस.डी.२,दि.२० ऑक्टोबर २०१६ नुसार मान्यता दिलेली आहे. ही सवलत GCC-TBC परीक्षेसाठीही लागू राहिल.

१२. आवेदनपत्रात खोटी माहिती देणे, आवेदनपत्रासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करुन सादर करणे या कारणांमुळे उमेदवार परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व त्याची/तिची सदर परीक्षेची संपादणूक रद्द होईल, तसेच संबंधित संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.

१३. उमेदवार, संस्थाप्रमुख व प्राचार्य यांनी आवेदनपत्रावरील Update या बटनावर क्लिक करण्यापूर्वी आवेदनपत्रामधील आवश्यक असलेले सर्व रकाने बरोबर भरले असल्याची खात्री करावी.

१४. **परीक्षार्थीचे एका विषयासाठी एकच आवेदनपत्र भरावे. एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे भरल्यास त्या विषयाची सर्व आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील, त्यामुळे याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी. परीक्षार्थींनी एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे त्याच किंवा इतर संस्थेमधून भरली नसल्याची संस्थाप्रमुखांनी खात्री करावी. तसे हमीपत्र विद्यार्थ्यांकडून घेऊन आपल्या दप्तरी ठेवावे.**

१५. **संस्थाप्रमुखाने कोणत्याही अनधिकृत संगणक टंकलेखन संस्थेच्या विद्यार्थ्याचे आवेदनपत्र आपल्या संस्थेमार्फत भरु नयेत. तसे निदर्शनास आल्यास सदर भरलेली सर्व ऑनलाईन आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील व आपल्या संस्थेची शासन मान्यता काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.**

१६. **<u>उपस्थितीबाबत</u> :-**

**विद्यार्थ्यांची परीक्षेपर्यंतची उपस्थिती किमान ८०% असणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षेपर्यंत ८०% उपस्थिती म्हणजेच ४ महिने किंवा ८० घड्याळी तास प्रशिक्षण पुर्ण होत नाही, अशा विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे वितरीत करु नयेत, ती परिषदेस परत करावीत. आपण प्रवेशपत्रे वितरीत केल्यास व असे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झालेचे परिषदेच्या निदर्शनास आल्यास विद्यार्थ्यांची सदर परीक्षेची संपादणुक रद्द करण्यात येईल व आपल्या संस्थेवर योग्य ती कारवाई करण्यात येईल. याबाबत भविष्यात तक्रार प्राप्त होऊन त्यात सत्यता आढळुन आल्यास त्याकरिता संस्थाप्रमुख म्हणून आपण सर्वस्वी जबाबदार रहाल.**

**स्वाक्षरीत/-**
**(सुखदेव डेरे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-४११ ००१.**

**प्रत माहितीस्तव कार्यवाहीस्तवः-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व, महाराष्ट्र राज्य.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व, महाराष्ट्र राज्य.
३. शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

**प्रत माहितीस्तव सविनय सादरः-**

१. मा.राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट् राज्य
२. मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
३. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. मा.कुलसचिव (सर्व विद्यापीठे), महाराष्ट्र राज्य.

# परीक्षा विद्यार्थी यादी नमुना

# G.C.C. EXAMINATION (GCC-TBC- 30 & 40 W.P.M.) August- 2017- Candidate list

**PAGE NO. :** ______

**NAME OF THE INSTITUTE :** ____________________

**INSTITUTE CODE NO.:** ☐☐☐☐☐

*USE CODE NUMBERS ONLY ( To be filled in by the Head of the Institute )

| Sr. No. | Name Of The Candidate | Form No. | Instt. Gen. Register No. | Subject Code No. | Signature Of Candidate |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |
| | | | | ☐☐ | |

This is to Certify that the above enlisted candidates are the bonafide students of this Institute. They have fulfilled all the conditions required for appearing at the GCC- TBC Examination as per the rules and each candidates has signed personally.

*** Subject Code :- 1) English GCC-TBC 30 W.P.M. = 15, 2) Marathi GCC-TBC 30 W.P.M. = 25, 3) Hindi GCC-TBC 30 W.P.M. = 35,**
**4) English GCC-TBC 40 W.P.M. = 16, 5) Marathi GCC-TBC 40 W.P.M. = 26, 3) Hindi GCC-TBC 40 W.P.M. = 36,**

SEAL OF THE INSTITUTE

**Phone No.---------------------------**

**E-mail Id. ----------------------------**

SIGNATURE
HEAD OF THE INSTITUTE